पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

पुणे महानगरपालिका
सभेचा वृत्तांत ( सभा क्रमांक १६ )
मंगळवार, दिनांक १०/५/२०२२, दुपारी ३.५० वाजता

पुणे महानगरपालिकेची मासिक (स्थगित) सभा (माहे फेब्रूवारी २०२२ च्या कार्यपत्रिकेवरील कामकाजासाठी प्रथम दिनांक १८/२/२०२२ रोजी बोलविलेली) महानगरपालिकेच्या मा.महापालिका आयुक्त कार्यालयातील सभागृहात भरली होती.

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा. विक्रम कुमार,भा.प्र.से. | – | प्रशासक तथा महापालिका |
| २) | मा. राजेंद्र मुठे | – | उपायुक्त (दक्षता व मालमत्ता व्यवस्थापन) |
| ३) | मा. श्रीनिवास कंदुल | – | मुख्य अभियंता (विद्युत) |
| ४) | श्री. शिवाजी दौंडकर | – | नगरसचिव |

**मा. विक्रम कुमार, भा.प्र.से, महापालिका आयुक्त तथा प्रशासक, पुणे मनपा हे सभापती म्हणून अध्यक्षस्थानी होते.**

**मा. प्रशासक :** सभा सुरु करावी.

**नगरसचिव :** माहे फेब्रूवारी २०२२ कार्यपत्रिका. मा.सभापती/प्रशासक यांनी विषय घेण्याचे आदेश दिले आहेत.

**विषय क्र. ८०४**

वानवडी येथील के.पी.सी.टी मॉल वानवडी येथे नव्याने विकसित होत असलेल्या हॉस्पिटल मध्ये विविध विद्युत विषयक कामे करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र./मआ/विद्युत/११६९, दि. १०/०१/२०२२ चे पत्र.

**ठराव क्रमांक :– ५६**

**संदर्भ :–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/ विद्युत/११६९ दि.१०/१/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२१४५ ,दि.१/२/२०२२

-----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारातघेऊन –

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क मधील तरतुदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत उदभवलेल्या आपत्कालीन परिस्थिती मध्ये वानवडी येथील के.पी.सी.टी मॉल वानवडी येथे नव्याने विकसित होत असलेल्या हॉस्पिटल मध्ये विविध विद्युत विषयक कामे करणे हे काम मे.डी. के. इलेक्ट्रीकल्स (११.५ % कमी दराने म्हणजेच र.रू. २३,७६,१०२=६६ जी.एस.टी.सह )मे.सिटी इलेक्ट्रीकल्स (१२.०२ % कमी दराने म्हणजेच र.रू. १२,४९,७४६=४७ जी.एस.टी.सह ) मे.एस.डी. इलेक्ट्रीकल्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स (११.९५ % कमी दराने म्हणजेच र.रू. ४,३१,८२३=६९) व मे. ॲडवान्स मेडिकल इंजिनिअरींग सिस्टीम (११.५५ % कमी दराने म्हणजेच र.रू. १०,०५,३५५=९६ जी.एस.टी.सह ) असे एकूण र.रू. ५०,६३,०२८=७८ पर्यंत काम करून घेणेस व त्यानुसार करार करणेस मा. महापालिका आयुक्त, पुणे मनपा यांची प्रशासकीय मान्यता मिळणेस व केलेल्या कामाचे ९०% बिल अदा करणेस व सदरची बाब निर्दर्शनास आणण्यात आल्याची नोंद घेण्यात येत आहे.

**निर्णय :– विषय क्र. ८०४ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

विषय क्र. ८१५

सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत स्वच्छता व पडीक हद्दीचे झाडण कामासाठी कंत्राटी सेवक नेमणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र./मआ/परीक्र३/१३७५, दि. ०३/०२/२०२२ चे पत्र.

**ठराव क्रमांक :– ५७**

**संदर्भ :–** १) सन २०२१–२२ चे अंदाजपत्रकातील प्राप्त तरतूद.
२) मा. स्थायी समिती ठराव क्र.३३८, दि. २१/७/२०२०.
३) खात्याचे ठेकेदारास कार्यादेश जा.क्र. ६२९६, दि. २१/१/२०२१.
४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र मआ/परि क्र. ३/१३७५ दि. ३/२/२०२२ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२३७ ,दि.९/२/२०२२

-----

**मा.महापालिका आयुक्तयांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –**

**सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत स्वच्छता व पडीक हद्दीचे झाडण कामासाठी कंत्राटी सेवक नेमणे या कामाचे ठेकेदार मे.लोकराज्य स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत. यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३ ) क अन्वये काम करून घेणेस खालील नमूद बाबी निदर्शनास आणण्यात आल्याची नोंद घेण्यात येत आहे.**

**१. मे. लोकराज्य स्वयंरोजगार सेवासहकारी संस्था मर्यादित यांचेकडून विना करारनामा काम करून घेणेस.**

**२. मे. लोकराज्य स्वयंरोजगार सेवासहकारी संस्था मर्यादित यांचेकडून दिनांक १६ नोव्हेंबर २०२१ ते नविन निविदा कार्यदेश दिनांकापर्यंत करण्यात येणाऱ्या कामाचे बिल रकमेपर्यंत अनामत रक्कम वजावट न करता अदा करणेस.**

**३. मे. लोकराज्य स्वयंरोजगार सेवासहकारी संस्था मर्यादित यांचेकडून सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ६७ (३) क अन्वये कामकाज करून घेणेस केलेल्या कामास कार्यात्तर मान्यता मिळणेस.**

**४. तसेच सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय निविदा प्रक्रीया पूर्ण होवून कार्यदेश होई पर्यंत मे. लोकराज्य स्वयंरोजगार सेवासहकारी संस्था मर्यादित यांचेकडून त्यांचे प्राप्त झालेल्या ६.४५ % जादा दरानुसार काम करणेस.**

**निर्णय :– विषय क्र. ८१५ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

विषय क्र. ८२९

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९५ अन्वये मा. महापालिका आयुक्त यांचे सन २०२२–२०२३ चे महसुली भांडवली इ. जमा व खर्चाचा आराखडा(अ व क ) संदर्भ क्र. १ महानगरपालिका मुख्य सभा ठरावानुसार १५ जानेवारी अगर तत्पूर्वी सादर करणेबाबत, मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र./मआ/मुले / १४०२, दि. ११/०२/२०२२ चे पत्र.

**ठराव क्रमांक :– ५८**

**संदर्भ :–** १) मा. महानगरपालिका सभा ठराव क्रमांक ३४९.
२) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/११६४, दि. ७/१/२०२२ चे पत्र.
३) मा. स्थायी समिती ठराव क्रमांक १९७८ दि.११/०१/२०२२.
४) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/१४०२, दि. ११/२/२०२२ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२८०,दि.१६/२/२०२२

----

**मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९५ अन्वये मा. महापालिका आयुक्त यांचे सन २०२२–२०२३ चे महसुली भांडवली इ. जमा व खर्चाचा आराखडा ( अ व क )संदर्भ क्र.१ महानगरपालिका मुख्य सभा ठरावानुसार १५ जानेवारी अगर तत्पूर्वी सादर करणे आवश्यक आहे.**

**संदर्भ क्र. २ अन्वये सन २०२२–२०२३ चे महसुली भांडवली इ. जमा व खर्चाचा आराखडा ( अ व क ) दिनांक २२ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. स्थायी समितीस सादर करणेस व मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता**

मिळणेबाबतचे विषयपत्र सादर केले होते त्यास संदर्भ क्र. ३ अन्वये मा. स्थायी समितीची मान्यता मिळून सदरचा विषय माहे जानेवारी २०२२ च्या मुख्य सभेत दाखल करण्यात यावा असे आदेश दिलेले आहेत.

परंतु काही अपरिहार्य कारणामुळे सदरचा अंदाजपत्रक आराखडा दिनांक २२ फेब्रुवारी २०२२ ऐवजी दिनांक ०७ मार्च २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. स्थायी समितीस सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

निर्णय :– विषय क्र. ८२९ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.

नगरसचिव : कार्यपत्रिका संपली.

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी जाहीर केले.

स्वाक्षरी /–xxx
शिवाजी दौंडकर,
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

*******

दि. १९–०८–२०२२ च्या सभेत वृत्तांत कायम केला.

स्वाक्षरी /–xxx

प्रशासक, पुणे म.न.पा.

**********